## <u>नियमित दिवाणी मुकदमा नं. २९/२०२४ – निशाणी २० लगत आदेश</u>

भारत हरिदास गायकवाड वि. पोपट पंढरीनाथ गंगणे इ.

CNR No. MHSO2000-0158-2024

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांचेतर्फे कैफियत दाखल करणेसाठी झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.१ हे वयस्कर व आजारी असल्यामुळे व औषधोपचारासाठी परगावी जाणेसाठी त्यांना कागदपत्रे घेवून वेळेत प्रस्तुतकामी म्हणणे देता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना म्हणणे देणेकामी ९ महिने १८ दिवसांचा विलंब झालेला असून प्रतिवादी यांनी जाणून-बुजून कोणताही विलंब केलेला नाही. तसेच सदर केसचे कामकाज ऑनमेरीट चालणेसाठी व नैसर्गिक न्याय मिळण्याच्या दृष्टीने सदरकामी म्हणणे देणेस ९ महिने १८ दिवसांचा झालेला विलंब माफ होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. अन्यथा या प्रतिवादी यांचे कायदेशीर हक्कावर गदा येवून प्रतिवादी यांना त्यांचे हक्कापासून वंचित रहावे लागणार आहे व या प्रतिवादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने विचार होवून सदरचा अर्ज मंजूर होणे आवश्यक झाले आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जावर वादी तर्फे म्हणणे मांडले की, अर्जातील कारण खरे नाही. अर्जास म्हणणे देणेकामी झालेल्या ९ महिने १८ दिवसांचा विलंबाबाबत गांभीर्यपूर्वक विचार व्हावा. प्रतिवादी मुद्दाम विलंब करुन अडथळा करत आहेत. सबब, अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

३. दोन्ही पक्षातर्फे युक्तिवाद ऐकला. वादी तर्फे सदरचा दावा प्रतिवादींचे विरुध्द जमिन मिळकतीची मोजणी होवून हद्दीखुणा कायम होवुन मिळण्याचा व वैकल्पीकरित्या अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळणेचा व निरंतर ताकीदीचा दाखल केला आहे. वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर प्रतिवादी क्र.१ यांनी मुदतीमध्ये कैफियत दिलेले नाही ही बाब स्पष्ट आहे, परंतु सदरचा अर्ज मंजूर केल्याने

दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादीचे नुकसान होणार नाही. प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबाचा विचार करता त्यांचेवर खर्च बसवून अर्ज मंजूर करणे योग्य होईल. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**आ दे श**

१. अर्ज (नि.क्र.२०) प्रतिवादी क्र.१ यांनी वादी यांना रक्कम रु.५००/– देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2025.09.23 11:39:57 +0530

दिनांक – २२/०९/२०२५

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

**<u>नियमित दिवाणी मुकदमा नं. २९/२०२४ – निशाणी २२ लगत आदेश</u>**

भारत हरिदास गायकवाड वि. पोपट पंढरीनाथ गंगणे इ.

CNR No. MHSO2000-0158-2024

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफियत" चा हुकूम रद्द होणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.१ हे वयस्कर व आजारी असल्यामुळे व औषधोपचारासाठी परगावी जाणेसाठी त्यांना कागदपत्रे घेवून वेळेत प्रस्तुतकामी म्हणणे देता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना म्हणणे देणेकामी विलंब झालेला असून मे.कोर्टाने प्रस्तुत प्रतिवादी विरुध्द विना म्हणणे आदेश पारीत केलेला आहे. प्रतिवादी यांनी जाणून-बुजून कोणताही विलंब केलेला नाही. सदर केसचे कामकाज ऑनमेरीट चालणेसाठी व नैसर्गिक न्याय मिळण्याच्या दृष्टीने विना म्हणणे झालेला सेट असाईड होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. अन्यथा या प्रतिवादी यांचे कायदेशीर हक्कावर गदा येवून प्रतिवादी यांना त्यांचे हक्कापासून वंचित रहावे लागणार आहे व या प्रतिवादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने विचार होवून सदरचा अर्ज मंजूर होणे आवश्यक झाले आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जावरती वादी तर्फे म्हणणे मांडले की, प्रतिवादींचा हा अर्ज कायदेशीर नाही. प्रतिवादी जाणीवपूर्वक दाव्याचे कामकाज लांबवित आहेत. सबब, अर्ज नामंजूर करावा ही विनंती.

३. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द 'विना कैफियत' आदेश झालेला आहे. वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर प्रतिवादी यांनी मुदतीमध्ये कैफियत दिलेली नाही ही बाब स्पष्ट आहे, परंतु सदरचा अर्ज मंजूर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादीचे नुकसान होणार नाही.

तसेच विलंबाचा कारण लक्षात घेता खर्च सदर प्रतिवादीवर ठेवणे योग्य नाही. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**आ दे श**

१. अर्ज ( नि.२२) मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द झालेला 'विना कैफियत' चौकशी आदेश रद्द करुन त्यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देणेत येते.

PRACHI RAVINDRA KULKARNI

Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2025.09.23 11:40:04 +0530

दिनांक – २२/०९/२०२५

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Civil Judge, J.D. & J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 23/09/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 23/09/2025 |